पुढारी

# नावीन्यपूर्ण संकल्पनेत सहभागी होण्याचे विद्यापीठाचे आवाहन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या नवोपक्रमाच्या माध्यमातून नावीन्यपूर्ण संकल्पनेमध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ३० सप्टेंबरपर्यंत नवनिर्मितीतून शाश्वत विकासाकडे प्रस्ताव सादर करता येणार आहेत.

शिवाजी विद्यापीठ नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. त्यानुसार सामान्यांतील नावीन्यपूर्ण संशोधकांना आमंत्रित करण्यात येत आहे. नावीन्यपूर्ण कल्पना केंद्रामार्फत पोहोचविल्या जाणार आहेत. प्रभावी, कार्यक्षम कल्पनांना मूर्त स्वरूप देण्यासाठी विद्यापीठ तांत्रिक सहाय्य प्रदान करणार आहे, अशी माहिती केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांनी दिली.

2 7 SEP 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पूर आपत्ती व्यवस्थापन विभाग स्वतंत्र आवश्यक

## नंदकुमार वडनेरे; विद्यापीठात 'धरणे, महापूर आणि हवामान बदल' यावर व्याख्यान

**टेंबलाईवाडी, ता. २६** : "राज्यात स्वतंत्र पूर आपत्ती व्यवस्थापन विभाग निर्माण करण्याची आवश्यकता आहे," असे जलसंपदा विभागाचे माजी प्रधान सचिव नंदकुमार वडनेरे यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठाच्या 'सेंटर फॉर क्लायमेंट चेंज अँड सस्टेनेबिलीटी स्टडीज'तर्फे ऑनलाईन व्याख्यानमाला झाली. 'धरणे, महापूर आणि हवामान बदल' यावर वडनेरे यांनी मांडणी केली. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील अध्यक्षस्थानी होते.

वडनेरे म्हणाले, पूर हा निसर्गाचा अविभाज्य भाग असला तरी त्याची तीव्रता कमी करणे शक्य आहे. त्यादृष्टीने पूर, हवामान बदलांकडे सकारात्मक दृष्टीने पाहावे. राज्य, केंद्र सरकार आता हवामान बदल धोरणासंदर्भात गांभीर्याने विचार करत आहे. पुराच्या अनुषंगाने स्वतंत्र खाते निर्माण करून केवळ पूरकाळातच नव्हे तर संपूर्ण वर्षभर नियोजन, संनियंत्रण करण्यासाठी शासनाच्या सर्वच विभागांतील उच्चपदस्थांमध्ये संवाद साधणे त्यामुळे शक्य होईल. यामध्ये जलसंपदा, जलसंधारण, शेती, सहकार, वित्त, मदत व पुनर्वसन अशा विभागांमध्ये समन्वय हवा. जलशास्त्राचा नव्याने अभ्यास करावा लागेल. विभागातील तज्ज्ञांची संख्या वाढवावी लागेल. माहिती तंत्रज्ञान, मदत व पुनर्वसन व्यवस्था यांचे सक्षमीकरण करावे लागेल. मदत-पुनर्वसनासाठी भरीव आर्थिक तरतूद आवश्यक आहे."



ऑनलाईन व्याख्यानमालेत बोलताना नंदकुमार वडनेरे.

### पूररेषेची काटेकोर अंमलबजावणी हवी

सांगली, कोल्हापूरसारख्या ठिकाणी पूररेषेची काटेकोर अंमलबजावणी प्रसंगी कायदा करून करायला हवी. इथे महापूर आला. मात्र, योग्य सांडपाणी निचरा व्यवस्थापनाचा अभाव, त्याचबरोबर कमी कालावधीत झालेली अतिवृष्टी कारणीभूत आहे. हवामान बदल, भौगोलिक परिस्थिती, भराव, धरणे, बंधारे, पूल, बांधकामे आदी अतिक्रमणे हीसुद्धा कारणे आहेत, असे वडनेरे म्हणाले.



धरणाचे आयुष्य हे त्याच्या संरचनात्मक स्थैर्यावर अवलंबून असते. चांगल्या धरणाचे आयुष्य हे साधारण शंभर वर्षे असते, असे अभियांत्रिकी शाखा सांगते. त्यामुळे आणखी काही वर्षांत आपल्याला त्यांच्या नूतनीकरणाचा विचार करावाच लागणार आहे. तथापि, या धरणांची देखभाल, सक्षमीकरण करीत राहणे आवश्यक आहे, असे मतही वडनेरे यांनी व्यक्त केले. डॉ. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. केंद्राचे समन्वयक डॉ. सचिन पन्हाळकर यांनी सूत्रसंचालन केले.

तरूण भारत

# रोजगार प्राप्तीसाठी हिंदी महत्वाची

**कोल्हापूर** : रोजगार प्राप्तीसाठी हिंदी महत्वाची आहे. त्यामुळे प्रत्येकाने हिंदी शिकायला हवी, असे मत सांगली येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयातील हिंदीचे माजी विभागप्रमुख डॉ. भीमराव पाटील यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्राच्या वतीने उच्चशिक्षण आणि रोजगाराच्या संधी यावरील ऑनलाईन करिअर मार्गदर्शन पंधरवड्यात बोलत होते. ते म्हणाले, दूरशिक्षण शिक्षण पद्धतीकडे गांभिर्याने पाहण्याची गरज आहे. रोजगारासाठी प्रयोजनमूलक हिंदीचा विद्यार्थ्यांनी अभ्यास केला पाहिजे. तसेच कौशल्यावर आधारित कोर्स केले पाहिजेत. लेखकाइतकेंच अनुवादकाला महत्त्व आहे. आधुनिक तंत्रज्ञान हिंदीच्या प्रत्येक विद्यार्थ्यांने शिकले पाहिजे. प्रा. बबन पाटोळे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. पी. एस. कांबळे यांनी आभार मानले.